**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार यादीतील मयत अथवा स्थानांतरीत मतदारांबाबत करावयाची कार्यवाही.**

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.४/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबईः- ४०० ०३२.
दिनांक- ११ ऑक्टोबर, २०१०.

### आदेश

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेताना राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या तारखेची अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी घेऊन संबंधित प्रभागांमध्ये / मतदार गट / मतदार गणामध्ये विभागण्यात येते. राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, या यादीमध्ये बरेच मतदार मयत अथवा स्थलांतरीत झालेले असतात. अशा ब-याच तक्रारी राज्य निवडणूक आयोगाकडे येतात तसेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिका-यांकडून याबाबत कोणती कार्यवाही करावी याची विचारणा होत असते. लोकप्रतिनिधित्व अधिनियमामधील तरतुदीनुसार प्रसिध्द केलेल्या विधानसभेच्या मतदार यादीमध्ये कोणतेही बदल करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास नाहीत.

मतदार यादीमध्ये ज्या मतदारांबाबत मयत अथवा स्थलांतरीत मतदार असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या असतील त्या मतदारांच्या नावावर कोणत्याही प्रकारचे खोटे (Bogus) मतदान होऊ नये याकरिता राज्य निवडणूक आयोग पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

१. मतदार यादीमध्ये ज्या मतदारांबाबत मयत अथवा स्थलांतरीत मतदार असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या असतील त्या मतदारांच्या नावासमोर विशिष्ट खूण करण्यात यावी.
२. मतदान केंद्राध्यक्षांनी अशा मतदारांच्या नावावर मतदानास आलेल्या व्यक्तींचे ओळखीचे पुरावे (राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या पुराव्यांपैकी) काटेकोरपणे तपासावेत.

३. याबाबत उमेदवारांनीही त्यांच्या मतदान प्रतिनिधीमार्फत अशा मतदारांच्या नावावर मतदानास आलेल्या व्यक्तींबाबत वेळीच हरकत घ्यावी असे आवाहन उमेदवारांच्या बैठकीमध्ये निवडणूक निर्णय अधिका-यांनी सर्व उमेदवारांना करावे.

४. मतदान केंद्राध्यक्षांनी अशा व्यक्तींची ओळख पटल्यानंतर त्यांना मतदान करु दयावे.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

आपला,

( मंगेश मोहिते )
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग

प्रत :-

सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

२०३
४२८

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक- रानिआ / मनपा - २०१२ / प्र.क्र.४ /का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबईः- ४०० ०३२.
दिनांक- ०७/०२/२०१२

वाचा :- १. आयोगाचे आदेश क्र. क्रमांक- रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.६/का.५, दि.२४ एप्रिल, २००७
२. आयोगाचे आदेश क्र. रानिआ / मनपा - २०१० / प्र.क्र.४ /का.५, दि.११/१०/२०१०

## परिपत्रक

मा.मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ७०८/२०१२ श्री. विनोद चंदीराम तलरेजा व अन्य एक विरुध्द तहसिलदार, अंबरनाथ व इतर मध्ये दि. ३१ जानेवारी, २०१२ मध्ये दिलेल्या निर्णयामध्ये राज्य निवडणूक आयोगास पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत :-

"मृत व्यक्तींच्या नावावर अन्य व्यक्ती मतदान करणार नाहीत. तसेच ज्या व्यक्तींची नावे एकापेक्षा जास्त प्रभागांच्या मतदार यादीमध्ये समाविष्ट झालेली आहेत अशा व्यक्ती, जर त्या अन्यथा मतदान करण्यास पात्र असतील, तर त्यांना फक्त एकाच प्रभागातून मतदान करण्यास परवानगी देण्यात येईल याची राज्य निवडणूक आयोगाने दक्षता घ्यावी."

या संदर्भात नमूद करण्यात येते की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये एकाच मतदाराचे नाव मतदार यादीमध्ये एकापेक्षा जास्तवेळा आले असल्यास किंवा एकापेक्षा जास्त मतदार याद्यामध्ये समाविष्ट झाले असल्यास त्या मतदारास एकापेक्षा जास्तवेळा मतदान करता येऊ नये किंवा त्याच्या नावावर अन्य व्यक्तीने मतदान करु नये यादृष्टीने करावयाच्या कार्यवाहीबाबत आयोगाच्या दि. २४/४/२००७ च्या आदेशान्वये सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच मतदार यादीतील मयत अथवा

स्थानांतरीत मतदाराबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत आयोगाच्या दि. ११/१०/२०१० च्या आदेशान्वये सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तरी उपरोक्त न्यायालयीन निर्णयाच्या अनुषंगाने आपणास पुन्हा सुचित करण्यात येते की, आयोगाच्या उपरोक्त आदेशात नमूद केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(डॉ. अ. द. कोल्हे)
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व महानगरपालिका आयुक्त.